कृत्रिम बुद्धिमत्ता व अग्रिटेक इनोवेशन केंद्र (AIAIC), मुंबई येथील कंत्राटी 'सल्लागार' पदावर नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
शासन निर्णय क्रमांक : अेआय-२०२६/प्र.क्र.१२२/१३-अे
(E file १६५९३११)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २१ जुलै, २०२६

वाचा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई-१५२५/ प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १०.०६.२०२५.

प्रस्तावना:-

कृषि विभागांतर्गत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अग्रिटेक नाविन्यता केंद्र' (AIAIC), मुंबई येथील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, तसेच चारही राज्य कृषि विद्यापीठांशी प्रभावी समन्वय साधून कृत्रिम बुद्धिमत्ता व प्रगत तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी अनुभवी तज्ज्ञांची कंत्राटी सेवा घेणे आवश्यक होते. या अनुषंगाने दिनांक १८ जून २०२६ रोजी मा. सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार निवृत्त प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार यांची कंत्राटी 'सल्लागार' म्हणून निवड करण्याचे प्रस्तावित आहे.

शासन निर्णय:-

'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अग्रिटेक नाविन्यता केंद्र' (AIAIC), मुंबई अंतर्गत विविध उपक्रम, डिजिटल शेती, जीआयएस व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांच्या संनियंत्रणासाठी डॉ. सुनील गोरंटीवार (सेवानिवृत्त प्राध्यापक व विभाग प्रमुख, राज्य कृषि विद्यापीठ) यांची, ते नियुक्ती स्वीकारतील त्या दिनांकापासून ११ महिन्यांसाठी संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद १ (इ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून, याद्वारे कंत्राटी पद्धतीने 'सल्लागार' (Advisor) पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

अटी व शर्ती -

(१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

(२) उपरोक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीत देय होणारे मासिक पारिश्रमिक व भत्ते याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

(३) नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी, आगाऊ सूचना न देता उपरोक्त अधिकाऱ्याच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. त्यासाठी कारणे देणे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहणार नाही.

(४) उपरोक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्यावर सोपवलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही. तसेच त्यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

(५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधारसामग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

(६) उपरोक्त अधिकाऱ्यास सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. डॉ.सुनील गोरंटीवार हे आपले कामकाज व मासिक अहवाल थेट व्यवस्थापकीय संचालक, AIAIC यांना सादर करतील. संबंधित अधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन सदर कामाचे मूल्यमापन करतील.

(७) उपरोक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही या अटीच्या अधीन राहून सदरची नियुक्ती करण्यात येत आहे. तसे स्व-घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १०.०६.२०२५ मधील परिच्छेद २ मध्ये नमूद तरतूद लक्षात घेता, डॉ. सुनील गोरंटीवार यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

३. डॉ. सुनील गोरंटीवार यांचे मुख्य कार्यक्षेत्र चारही राज्य कृषि विद्यापीठांशी समन्वय साधण्याच्या उद्देशाने पुणे येथे राहील आणि आवश्यकतेनुसार ते प्रत्यक्ष व ऑनलाईन दोन्ही पद्धतीने कार्यरत राहतील.

४. डॉ. सुनील गोरंटीवार यांच्या मासिक पारिश्रमिक व भत्त्यांवर होणारा खर्च हा विभागाच्या "१० कंत्राटी सेवा" या उद्दिष्ट शीर्षाखाली त्या-त्या वित्तीय वर्षांमध्ये उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. डॉ. सुनील गोरंटीवार यांनी करार पद्धतीने सेवेकरिता रुजू होण्यापूर्वी, नियुक्ती कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची तसेच विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र/हमीपत्र व्यवस्थापकीय संचालक, AIAIC यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

६. हा शासन आदेश, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०.०६.२०२५ अन्वये प्रशासनिक विभाग या नात्याने कृषि विभागास प्राप्त अधिकारांचा वापर करून सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२११६०९४००७४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.07.21 16:10:52 +05'30'

(डॉ. ललितकुमार रं. धायगुडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कृषि), कृषी व पदुम विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला,
६. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
७. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
८. कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
११.वित्त विभाग (कार्यासन व्यय १/ अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
१२.अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सर्व कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,
१३. निवड नस्ती (कार्यासन १३-अे) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.